# जाहिर नोटीस

याद्वारे कळविणेत येते की, मे. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस तसेच त्यांचे अधिपत्त्याखालील मे.दिवाणी न्यायालय,कुडाळ व देवगड वगळता इतर तालुका न्यायालयांकरीता मंजूर झालेली सन २०२३ ची स्टेशनरी शासकीय मुद्रणालय व लेखन साम्रगी भांडार, कोल्हापूर येथून घेवून जिल्हा न्यायालय,सिंधुदूर्ग यांचे कार्यालयापर्यंत पोहोच करावयाची आहे. तरी, सदर कामी जिल्हा न्यायालय,सिंधुदूर्ग—ओरोस ते शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर व कोल्हापूर येथून स्टेशनरीचे अंदाजे सुमारे ५५ ते ६० गठ्ठे घेवून परत जिल्हा न्यायालय,सिंधुदूर्ग—ओरोस यांचे कार्यालयापर्यंत येणेकरीता खाजगी वाहन भाडयाने घेणे विचाराधीन आहे. त्याकरीता याद्वारे वर नमुद वहातुकीच्या खर्चाचे दरपत्रक/निविदा मागविणेत येत आहेत.

**अटी व शर्ती**

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधुन, मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदूर्ग—ओरोस यांचे नांवे असावे. लखोटयावर 'वहातूक खर्चाचे दरपत्रक' असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा—या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेकामी संबंधीत पुरवठादार यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, पासबुकची पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत किंवा रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) वर नमुद वहातुकीचे दरम्यान येणारा टोल किंवा तत्संबंधीचा अन्य खर्च संबंधीत पुरवठादार यांनी सोसावयाचा आहे.

४) वहातुकी दरम्यान वस्तूचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी पुरवठादार यांनी घ्यावयाची आहे.

५) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

६) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदूर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुकांनी पुढील अटी व शर्तीस अधीन राहून ही नाटीस प्रसिध्द झालेचे दिनांकापासून आठ दिवसांच्या आत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग येथे सादर करावीत.

दिनांक :—०७/०३/२०२४

सहाय्यक अधीक्षक(वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा./९४८२ सन २०२४
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस
दिनांक :— ०७/०३/२०२४

प्रत माहितीसाठी व जरूरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग. (ई—मेलद्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस(ई—मेलद्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नोटीसबोर्डवर
८. डी.एस.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता(ई—मेलद्वारे)